## प्रकरण सहावे : मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' यांची सद्यस्थिती तसेच दोहोंच्या सुधारणा/विकासासाठी सूचना

| | |
|---|---|
| 6.1 | प्रस्तावना |
| 6.2 | मराठी संगीत नाटक : सद्यस्थिती |
| 6.3 | कोंकणी 'तियात्र' : सद्यस्थिती |
| 6.4 | मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' या दोहोंच्या सुधारणा/विकासासाठी सूचना |
| 6.5 | समारोप |

### 6.1 प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकाच्या सुमारास मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' यांची सुरुवात झाली. या दोन्ही साहित्यकलाप्रकारांच्या साहित्यिक-सांगीतिक-नाट्यात्म-रंगमंचीय तसेच सामजैक-सांस्कृतिक-वैचारिक कार्याच्या प्रवासाला शतक-दीड शतक काळ लोटला आहे. या कालावधीत या दोन्ही साहित्यकलाप्रकारांनी विविध प्रकारची स्थित्यंतरे, बदल, सुधारणा अनुभवलेले आहेत. कालानुरूप आवश्यक ते बदल करत या दोन्ही साहित्यकलाप्रकारांची वाटचाल आजवर झाली आहे. परंतु, आज एकविसाव्या शतकात बदललेल्या आधुनिक परिप्रेक्ष्यात या दोन्ही साहित्यकलाप्रकारांनी वेगळ्या विचारसरणीचा आणि मानसिकतेचा स्वीकार करत आधीच्या तुलनेत वेगळे बदल करण्याची आवश्यकता आहे. हे बदल केल्यास दोन्ही साहित्यकलाप्रकारांचे स्थान अधिक मजबूत होण्यास तसेच त्यांच्या एकूण संर्वांगीण वाढीस चालना मिळण्याची शक्यता आहे. त्या-त्या साहित्यकलाप्रकाराच्या चौकटींतर्गत केले जाऊ शकणारे काही बदल/सुधारणा तसेच दोन्ही साहित्यकलाप्रकारांनी एकमेकांकडून ज्या मुद्द्यांचा स्वीकार केला जाऊ शकतो त्यांचा प्रस्तुत विवेचनात विचार करण्यात आलेला आहे.

### 6.2 मराठी संगीत नाटक : सद्यस्थिती

मराठी संगीत नाटकाचा विचार करता, 2007 साली आलेले संगीत ‘अवघा रंग एक जाला’ हे रंगभूमीवरचे अखेरचे संगीत नाटक म्हणून पहावयास मिळते. त्यानंतर नवे, स्वतंत्र संगीत नाटक लिहिले गेल्याचे दिसत नाही. मराठी संगीत नाटकाची प्रदीर्घ परंपरा अखंड राखण्यासाठी नव्या संगीत नाटकांचे लेखन, दिग्दर्शन आणि सादरीकरण होणे नितांत आवश्यक आहे.

नवे, स्वतंत्र संगीत नाटक लिहिणे एवढेच या संवर्धनाच्या कामी आवश्यक नसून, संगीत नाटकाच्या पारंपरिक चौकटीनुसार आवश्यक इतर घटक, उदा. लेखक, दिग्दर्शक, कलाकार, वादक, संगीत दिग्दर्शक, नेपथ्यकार, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजनाकार, रंगभूषाकार, वेशभूषाकार, वेशभूषा पुरवणारे व्यावसायिक, जाहिरातकार इ. निर्माण होण्याची गरज आहे. नव्या पीढीतून हे सर्व घटक तयार होण्यासाठी नव्या पीढीला मराठी संगीत नाटकाची ओळख, गोडी, आत्मीयता निर्माण होणे तसेच हा साहित्यकलाप्रकार जिवंत ठेवण्याचा जाज्वल्य अभिमान त्यांच्या मनात निर्माण होणे अतिशय गरजेचे आहे.

मराठी संगीत नाटकांचा परिचय नव्या पीढीला होण्यासाठी जुन्या संगीत नाटकांचे प्रयोग अधिकाधिक होणे गरजेचे आहे. हे करताना केवळ ठराविक परिचित, लोकप्रिय नाटकांचेच प्रयोग न करता अज्ञात अशा अन्य नाट्यकलाकृतींचाही विचार करणे आवश्यक आहे. शक्य तेवढ्या वैविध्यपूर्ण आणि विषयांच्या बाबतीत विचार करता सर्वसमावेशी अशा नाट्यकलाकृती प्रेक्षकांसमोर सादर झाल्यास त्यातून नवी पीढी संगीत नाटकाकडे वळण्याचा संभव आहे.

जुन्या संगीत नाटकांतील अनेक विषय आजही खूप प्रमाणात प्रासंगिक आहेत. अशा कलाकृती सादर झाल्यास त्याद्वारे मनोरंजन आणि समाजप्रबोधन ही दोन्ही उद्दिष्टे सहजपणे साध्य करता येऊ शकतात. मात्र त्यासाठी अनेक कलाकृतींचा शोध घेणे, त्यांच्या संहिता मिळवणे, त्यांतील नाट्यपदांच्या चाली शोधणे, त्या नाट्यसादरीकरणासाठी सुयोग्य कलाकार शोधणे, सादरीकरण दर्जेदार व्हावे यासाठी सुयोग्य दिग्दर्शकाचा शोध घेणे या बाबींचा पाठपुरावा करवा लागेल.

नाट्यसादरीकरणाच्या क्षेत्रातील आजच्या काळातील महत्त्वाच्या व्यावहारिक अडचणींपैकी एक म्हणजे कलाकरांची अनुपलब्धता होय. जुन्या काळी पूर्णवेळ नाट्यक्षेत्राला वाहून घेतलेली आणि नाटक वा तत्सम क्षेत्रातच आपली कारकीर्द कलाकार मंडळी करत असत त्यामुळे कोणत्याही नव्या

कलाकृतीसाठी कलाकार सहजपणे मिळणे शक्य होई. आज बहुतांश कलाकार उदरनिर्वाहासाठी अन्य क्षेत्रांत कार्यरत असून नाटकात काम करणे या बाबीकडे ते केवळ छंद म्हणून पाहतात. त्यामुळे, आपल्या उदरनिर्वाहाच्या व्यवसायाला वा कार्यक्षेत्राला प्रथम प्राधान्य देऊन फावल्या वेळेत नाटक करणे हा प्रकार पहावयास मिळतो. यामुळे देखील नाट्यसादरीकरणासाठी आवश्यक आणि दर्जेदार कलाकार मिळणे कठीण बनते. नव्या नाट्यकलाकृतींचे सादरीकरण न होण्यास हाही मुद्दा कारणीभूत आहे. जुन्या काळी स्त्री पात्रासाठी आवश्यक, सुयोग्य कलाकार न मिळणे हा अडचणीचा मुद्दा असे. आजच्या आधुनिक काळात स्त्री आणि पुरुष अशा दोन्ही प्रकारांतील नाट्यकलाकार मिळणे कठीण होताना दिसत आहे.

आधुनिक काळात नाट्यसादरीकरण ही फार खर्चिक बाब बनत चालली आहे. नाटकाच्या एखाद्या प्रयोगासाठी वेगवेगळ्या प्रकारचा प्रचंड खर्च करावा लागतो. नाटक उभारण्यासाठी अनेक दिवस आधी केला जाणारा सराव आणि त्यात होणारा विविध प्रकारचा खर्च, कलाकारांचे मानधन, वादक आणि इतर तंत्रज्ञांचा खर्च, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना, जाहिरात इ. साठी लागणारा खर्च आजच्या घडीला फार मोठ्या प्रमाणात आहे. जुन्या काळी नाटक मंडळी आपल्या आधीच्या नाट्यप्रयोगांतून मिळालेल्या नफ्याच्या ठेवींतून हा खर्च करीत असत आणि नव्या नाट्यप्रयोगांतून येणाऱ्या मिळकतीतून त्याची भरपाई आणि वृद्धी होत असे. आज अनेक नाटक मंडळींना प्रत्येक प्रयोगाच्या वेळी नवीन प्रायोजक वा पुरस्कर्ता शोधावा लागतो. अनेकदा हौशी कलाकार एकत्र येऊन आपल्या नाट्यप्रेमापोटी स्वत:च्या खर्चाने नाट्यउभारणी करतात. सादर केल्या जाणाऱ्या प्रयोगातून अनेकदा पूर्ण आर्थिक परतावा क्वचितच होतो. ‘ना नफा ना तोटा’ या तत्वावर नाटक सादर करावयाचे म्हटले तरी अनेकदा तोटा पदरी पडतो. यामुळे देखील हौशी मंडळी नाटकावर अव्यावहारिकतेचा ठपका ठेवून त्याकडे पाठ फिरवतात.

मनोरंजनाची इतर साधने आज मुबलक प्रमाणात आणि अत्यल्प दरात उपलब्ध असल्याने त्याकडेही प्रेक्षकांचा कल वाढत आहे. याच विविध ई-साधनांवर जुनी, अभिजात, श्रेष्ठ, दर्जेदार नाटकेही उपलब्ध होत आहेत. एखाद्या प्रेक्षकाला नाट्यास्वाद घ्यायचाच असल्यास घरबसल्या या

माध्यमांवरून नाट्यानुभूती त्याला घेता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे देखील अनेकदा प्रत्यक्ष नाट्यप्रयोगांना प्रेक्षकांची उपस्थिती फारशी लागलेली दिसत नाही.

ज्या शास्त्रीय संगीताच्या आवडीने प्रेक्षक मराठी संगीत नाटकाकडे येत असत ते शास्त्रीय संगीत जुन्या काळी सहजपणे आस्वादता येत नसे. आजच्या काळात शास्त्रीय संगीताच्या मैफिली, जलसे, कार्यक्रम सहजपणे आयोजित होताना दिसतात. आपल्याला प्रत्यक्षपणे या कार्यक्रमांना उपस्थित राहता येत नसले तरी वेगवेगळ्या ई-माध्यमांवरूनही त्यांचा आस्वाद घेण्याची सोय आज रसिकप्रेक्षकांना उपलब्ध आहे. ज्या शास्त्रीय संगीतासाठी म्हणून प्रेक्षक मराठी संगीत नाटकाकडे वळत तेच आज विशुद्धपणे रसिकांसमोर उपलब्ध असल्याने ‘संगीत नाटकाकडे जाण्याची काय गरज?’ असा विचारही प्रेक्षक करताना दिसतात.

संगीत नाटकाच्या फेरउभारणीसाठी शासकीय स्तरावरूनही आधार होण्याची गरज आहे. राज्य सरकारांनी संगीत नाटकाच्या लेखन आणि सादरीकरणासाठी स्वतंत्र विभाग विभारून या कलाप्रकारासाठी आवश्यक निधीची व्यवस्था करणे आवश्यक आहे. याचबरोबर संगीत नाटकांच्या सादरीकरणासाठी सुयोग्य अशी सभागृहे, तांत्रिक बाबींची पूर्तता करणाऱ्या संस्था यांची उभारणी होण्यासाठी प्रोत्साहन देणे या बाबीही शासकीय पातळीवर झाल्यास संगीत नाटक नव्याने पुढे येऊ शकेल. नव्याने संगीत नातक लिहिणाऱ्या लेखकांसाठी प्रोत्साहनवृत्ती वा लेखनसाहाय्य दिल्यास नव्या कल्पनांसह आधुनिक काळात नवे संगीत नाटककार उदयास येऊ शकतील.

शासकीय आधार हा निधी आणि सुविधांची पुरवण यापुरता मर्यादित असतो. मात्र कोणत्याही कलेच्या उत्कर्षासाठी सर्वात महत्त्वाचा असतो तो म्हणजे रसिकांचा, प्रेक्षकांचा, जाणकारांचा आधार. मराठी संगीत नाटकाला पुन्हा एकदा वाढता लोकाश्रय प्राप्त होण्याची नितांत गरज आहे. नाट्यनिर्मितीसाठी आवश्यक सर्व गरजांची पूर्तता जरी विविध पातळ्यांवरून केली तरी रसिकांची उपस्थिती आणि प्रोत्साहन मिळाल्याशिवाय संगीत नाटक नव्या उभारीने पाऊल टाकू शकणार नाही.

शासकीय तसेच बिगर-सरकारी सांस्कृतिक संस्थांमार्फत विविध स्तरांवर नाट्यकार्यशाळांचे आयोजन हे या कामी अतिशय उपयोगी ठरू शकते. नाट्यक्षेत्राची आधुनिक दृष्टी आणि त्याचे

परंपरागत ज्ञान या दोन्हींचा मेळ घालत नवे संगीत नाटक निर्माण करू शकणारी नवी पीढी तयार करण्यासाठी या उपक्रमाची मदत होऊ शकते. नाट्यलेखन, नाट्यपदलेखन, संगीत दिग्दर्शन, नाट्यदिग्दर्शन, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा, वाद्य-साथसंगत, गायकी, अभिनय, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना, निर्मिती साहाय्य, प्रसिद्धी या सर्व बाबींचे सखोल आणि प्रगत प्रशिक्षण या कार्यशाळांच्या निमित्ताने विविध व्यक्तींना दिल्यास नवे कलाकार आणि तंत्रज्ञ निर्माण होतील. संगीत नाटकाच्या क्षेत्रातील उपलब्ध जाणकारांची मदत या कामी घेतल्यास अधिक प्रभावी मार्गदर्शन नव्या पीढीला मिळेल.

शालेय तसेच उच्चशिक्षण स्तरावर नाट्य-अभ्यासक्रम लागू केल्यास त्याचाही लाभ संगीत नाटकाच्या पुनर्बांधणीस होईल. शालेय शिक्षणात तसेच महाविद्यालय-विद्यापीठीय स्तरावर त्या-त्या स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आकलन आणि अभिरुचीनुरूप नाट्यविषयक अभ्यासक्रम सुरू केल्यास नाट्यक्षेत्राच्या वाढीसोबतच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासालाही त्याचा लाभ होईल.

नाटक या साहित्यकलाक्षेत्रासंदर्भात अधिकाधिक संशोधन झाल्यास त्यातूनही संगीत नाटक अधिक समृद्ध होईल. अनेक संगीत नाटके काही मोजक्या प्रयोगांनंतर पुन्हा रंगमंचावर आलेली दिसली नाहीत. अशा संगीत नाटकांचा पाठपुरावा करून त्यांचे पुन्हा नव्याने रंगमंचीय सादरीकरण करता येण्याची शक्यता आजमावून पाहिली पाहिजे. त्यातील संगीतासारखे काही घटक कदाचित नव्याने बसवण्याचा प्रयत्न करावा लागू शकतो. त्याचीही तयारी ठेवली गेली पाहिजे. नाट्यक्षेत्राचे संशोधन झाल्यास जुन्या काळातील नाट्यव्यापाराचा अधिक सखोल परिचय वाचक आणि रसिकांना होईल. अनेक संगीत नाट्यकलाकृती केवळ लिहिल्या आणि प्रकाशित केल्या गेल्या परंतु त्यांचे रंगमंचीय प्रयोग कधीच झाले नाहीत. अशा नाट्यकृतींचे संशोधन करून त्यांचे नाट्यप्रयोग सादर झाल्यास जुन्या काळातील नाट्यप्रवासाची वेगळी ओळख होऊ शकेल. उदाहरणार्थ, हिराबाई पेडणेकर यांनी 1904 साली प्रकाशित केलेल्या जयद्रथ विडंबन या नाटकाचा पहिलावहिला प्रयोग तब्बल 116 वर्षांनंतर गोव्यातील श्री. विजयकुमार नाईक यांच्या व्हीटीबीटी (विजयकुमार्स ट्रॅव्हलिंग बॉक्स थिएटर) या नाट्यसंस्थेने 2020 साली राजीव गांधी कला मंदीर, फोंडा-गोवा येथे सादर केला. या कलाकृतीच्या निमित्ताने हिराबाई पेडणेकरांच्या आद्य नाट्यकृतीची ओळख तसेच या नाटकातून

त्यांनी व्यक्त केलेले स्त्रीजीवनाचे अप्रत्यक्ष वर्णन, तत्कालीन स्त्रीजीवन आणि त्यांचे स्वत:चे आयुष्य यांचे प्रतिबिंब दिसते.

विविध पातळ्यांवरून आजवर सादर होत आलेली तीच ती ठराविक नाटके बहुतांश प्रेक्षकांना अतिपरिचयाची झालेली आहेत. या नाटकांतील संवाद, गीते, संगीत आणि इतर घटक प्रेक्षकांच्या एवढे परिचयाचे झालेले आहेत की तीच ती नाटके पाहण्याचा रस आज रसिकांना राहिलेला नाही. त्यामुळे, कालदृष्ट्या जुनी असली तरी सादरीकरण न झाल्याने त्या अर्थाने नवी वाटू शकणारी जुनी संगीत नाटके सादर करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. प्रत्येक पीढी ही काहीतरी नवे अपेक्षित असते. स्वतंत्रपणे नवे नाटक सादर करण्यासोबतच जुन्या, अज्ञात नाटकांचा प्रयोगही रसिकांना तेवढाच आकर्षक आणि औत्सुक्याचा वाटू शकतो.

संगीत नाटकाच्या क्षेत्रातील काही जुन्या संस्था आजही कार्य करताना पहावयास मिळतात. कला अकादमी (गोवा), भरत नाट्य संशोधन मंदीर (पुणे), भारत गायन समाज (कोल्हापूर), द गोवा हिंदू असोसिएशन (मुंबई) यांसारख्या संस्थांनी संगीत नाट्यक्षेत्रात आजवर भरीव योगदान दिले आहे. या संस्थांच्या कार्याला गती मिळण्यासाठी कार्यकर्त्या व्यक्तींचा आधार मिळणे आवश्यक आहे.

काळाच्या ओघात आणि परिस्थितीनुरूप अनेक नाट्यसंस्था संगीत नाटकाकडून गद्य नाटकाकडे वळत आहेत. गद्य नाटकासाठी तुलनेने लागणारी कमी साधनसुविधा आणि त्याकडे प्रेक्षकांचा असणारा ओढा यामुळे नाट्यसंस्था हा बदल करत आहेत. त्यामुळे देखील संगीत नाट्यनिर्मितीवर परिणाम होताना दिसतो. अशा संस्थांचे संगीत नाट्यसादरीकरण चालू रहावे यासाठी, त्यांचे व्यावहारिक प्रश्न समजून त्या दिशेने आवश्यक प्रयत्न होण्याची गरज आहे.

आजवरची संगीत नाटक परंपरा टिकून राहण्यात संगीत नाट्यस्पर्धांचाही महत्त्वाचा हातभार होता. शासकीय पातळीवर तसेच विविध संस्थांतर्फे संगीत नाट्यस्पर्धा, नाट्यप्रवेश स्पर्धा आयोजित होत असत. काळाच्या ओघात या स्पर्धांचे प्रमाण फार कमी झाले आहे. आर्थिक समस्या, संस्था बंद पडणे, प्रेक्षकांचा निरुत्साह तसेच अन्य कारणांमुळे या स्पर्धा कमी होताना दिसतात. संगीत नाटक स्पर्धा कमी झाल्याने या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्यांच्या उत्साहावरही परिणाम झाला आहे. व्यावसायिक रंगभूमीवर येण्याआधी या स्पर्धांच्या माध्यमातून आपली कला सादर करण्याची संधी अनेक होतकरू

आणि प्रतिभावान कलाकारांना मिळाली. आज या स्पर्धाच कमी झाल्याने ही संधीही उणी झाली आहे.

मुंबई येथील कल्याण गायन समाज संस्थेने 2021 साली मराठी संगीत नाट्यलेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात 35 नव्या संगीत नाटकांचे अर्ज आले आणि पैकी 10 नाटके अंतिम सादरीकरणासाठी निवडण्यात आली होती. अशा प्रकारचे स्तुत्य उपक्रम नव्याने संगीत नाटके लिहिण्यास नव्या पीढीला प्रवृत्त करणारे आहेत. असे प्रयत्न अधिकाधिक झाल्यास नव्या आशयाची संगीत नाटके रंगमंचावर निश्चितपणे येऊ शकतील.

दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीने अलिकडे अनेकविध संगीत नाटकांचे चित्रीकरण करून त्यांचे डिजिटल संवर्धन करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. विविध प्रदेशांतील नामवंत कलाकार आणि नाट्यसंस्थांशी संपर्क साधून, त्यांच्या नाट्यसादरीकरणाचे चित्रीकरण आपल्या स्टुडियोत करून सह्याद्री वाहिनीने जुनी-नवी संगीत नाटके संवर्धित करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. डिजिटल माध्यमावर कायम उरणारी ही सोय असल्याने या नाटकांचा संदर्भ रसिकांना, नाट्यसादरीकरणोत्सुक संस्थांना तसेच अभ्यासक-संशोधकांना निश्चित होईल. या उपक्रमात अधिकाधिक संगीत नाटकांची भर पडल्यास ही सोय निश्चितच संगीत नाट्यसंवर्धनाच्या क्षेत्रात मैलाचा दगड सिद्ध होईल.

बदलत्या काळात, नाटकांचे माध्यमांतर मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे. जुन्या नाट्यकलाकृतींचे चित्रपट रूपांतर करून ते नाटक नव्या पद्धतीने रसिकांपर्यंत पोचवण्याचा आणि त्याद्वारे मूळ कलाकृतीविषयी रसिकांच्या मनात कुतुहल निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळेही नव्या पीढीतील अनेक तरुण मंडळी जुन्या संगीत नाटकांकडे औत्सुक्याने पाहत आहेत. उदा. संगीत कट्यार काळजात घुसली यासारख्या नाटकामुळे तरुण पीढीमध्ये संगीत नाटकाविषयी गोडी निर्माण झाली. बालगंधर्व या चित्रपटाच्या निमित्ताने एकूणच संगीत नाट्यक्षेत्राची वैभवशाली परंपरा रसिकांसमोर सादर झाली. भाषांतर, रूपांतर या माध्यमांचा महत्त्वाचा हेतू म्हणजे रसिकांच्या मनात मूळ कलाकृतीविषयी उत्सुकता निर्माण करणे हा होय. त्या दृष्टीने संगीत नाटकांचे चित्रपट माध्यमांतर हा देखील संगीत नाटक संवर्धन आणि वाढीस अतिशय उपयुक्त असा मार्ग ठरू शकतो.

कोंकणी 'तियात्रा'प्रमाणे, आजूबाजूला घडणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय-धार्मिक-आर्थिक घटनांवर भाष्य करणारी संगीत नाटके लगोलग मंचावर आली पाहिजेत. एखादी घटना घडण्याच्या काही काळातच त्या विषयावरील संगीत नाटक समाजासमोर आल्यास त्याद्वारे समाजात त्या घटनेविषयी, त्या विषयासंदर्भात वेगवेगळ्या प्रकारचे विचारमंथन सुरू होऊन समाजमन जागृत होईल.

बाल 'तियात्र' या प्रमाणेच संगीत नाटकात बाल संगीत नाटक हाही एक नवा प्रवाह येण्यासंदर्भात विचार होणे आवश्यक आहे. लहान वयोगटातील मुले, त्यांचे भावविश्व, त्यांच्या कल्पना यांनाच केंद्रस्थानी ठेवून संगीत हा घटक अंतर्भूत करून नाट्यनिर्मिती झाल्यास त्याद्वारे बालमनाला वेगळे वळण आणि त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्याची संधी निर्माण होईल.

### 6.3 कोंकणी 'तियात्र' : सद्यस्थिती

आजच्या घडीला विचार करता 'तियात्रा'ला फार मोठ्या प्रमाणात सामाजिक प्रतिष्ठा आणि मान प्राप्त झाला आहे. काळानुरूप 'तियात्रा'कडे पाहण्याचा सर्वच घटकांचा दृष्टीकोन बदलला असून त्याचा प्रभाव म्हणून 'तियात्रा'ची एकूण स्थितीगती सुधारली आहे. विविध घटकांकडून मिळणारे प्रोत्साहन 'तियात्रा'ला ऊर्जा आणि बळकटी देत आहे. सामाजिक स्तरावर पाहता ख्रिस्ती समाजाप्रमाणेच हिंदू धर्मीय देखील 'तियात्रा'चे लेखन आणि सादरीकरण यांत तेवढ्याच आत्मीयतेने आणि समर्थपणे सहभाग घेऊन योगदान देताना दिसत आहेत.

1974 साली सुरू झालेल्या, गोवा कला अकादमीच्या 'तियात्र' स्पर्धेच्या निमित्ताने, 'तियात्रा'च्या संहिता प्रकाशित करण्याचा प्रघात सुरू झाला. त्याआधी तियाताच्या संहिता प्रकाशित करण्याची पद्धतच नव्हती. 'तियात्रा'चा इतिहास जाणून घेण्यास आज अभ्यासक-संशोधकांना जी महत्त्वाची अडचण जाणवते ती प्रामुख्याने हीच आहे. परंतु अलिकडच्या काळात 'तियात्र' लेखन आणि संहिता प्रकाशन फार मोठ्या प्रमाणात होताना दिसते. कला अकादमीच्या 'तियात्र' स्पर्धेच्या निमित्ताने 'तियात्र' लेखनात शिस्त, व्यावसायिकता, गंभीरता, लेखनातील वैविध्य या बाबी समाविष्ट

झाल्या आणि त्यामुळे ‘तियात्र’ लेखनाचा स्तरही बदलला. याच पद्धतीने पुढील काळातही ‘तियात्र’ लेखनाची परंपरा चालू राहण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न आवश्यक आहेत.

‘तियात्र’ या नाट्यप्रकाराचा सांभाळ आणि संवर्धन जवळपास पूर्णपणे गोमंतकीय ख्रिस्ती समाजाने केले आहे. अलीकडच्या काळात काही हिंदू धर्मीय कलाकार देखील यात लेखन आणि सादरीकरण या पातळ्यांवर सहभागी होताना दिसून येतात. एकेकाळी प्रामुख्याने ख्रिस्ती समाजापुरता मर्यादित असणाऱ्या ‘तियात्र’ या नाट्यकलाप्रकाराला आज हिंदू समाजातील प्रेक्षकही मुबलक संख्येने उपस्थिती लावताना दिसून येतात.

आजच्या काळात ‘तियात्रा’समोर आवश्यक मनुष्यबळाची अडचण मोठ्या प्रमाणात असलेली जाणवते. एका विशिष्ट भौगोलिक प्रदेशात प्रामुख्याने केंद्रीत असलेला कलाप्रकार असल्याने यासाठी योगदान देणारे संभाव्य हातही याच प्रदेशात शोधावे लागतात. संगीत नाटक आणि कोंकणी ‘तियात्र’ यांच्यासमोर असणाऱ्या समान अडचणींपैकी एक अडचण म्हणजे मनुष्यबळाचा वाढता अभाव. ‘तियात्रा’चा भौगोलिक व्याप तुलनेने फार छोटा असल्याने त्याच्यासमोरील अडचण अधिक बिकट आहे. यात सुधारणा करण्यासाठी ‘तियात्रा’ने आपले कार्यक्षेत्र अन्य समाजगटांपर्यंत विस्तारण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे.

ख्रिस्तीबहुल असा कलाप्रकार म्हणून ज्ञात असलेल्या ‘तियात्रा’त हिंदू समाजातील काही व्यक्तींनी आजवरच्या प्रवासात योगदान दिलेले पाहता येते. परंतु, भाषिक आणि लिपीच्या स्तरावरील अडचण असल्याने आजही हिंदू लोक ‘तियात्रा’चे वाचन वा प्रयोगाला क्वचितच हजेरी लावताना दिसतात. रोमी लिपीतील संहिता हा महत्त्वाचा अडचणीचा भाग ठरतो. कोंकणी ‘तियात्रां’चे लेखन देवनागरी लिपीतून झाल्यास त्याचे वाचन, आस्वाद, अभ्यास, चिंतन, संशोधन या बाबी अन्य समाजगटातील लोकही स्वीकारण्यास पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नियमितपणे होणाऱ्या व्यावसायिक सादरीकरणासोबतच ‘तियात्रा’चे विविध अन्य प्रसंगी होणारे सादरीकरण प्रामुख्याने एखाद्या चर्च व चॅपेलच्या (छोटी चर्च) मुख्य उत्सवाच्या वेळी करण्यात येते. गोव्यातील गोवा कला अकादमी दरवर्षी राज्यस्तरीय तियात्र स्पर्धेचे आयोजन करीत असते.

याचप्रमाणे गोवा ‘तियात्र’ अकादमी दरवर्षी ‘तियात्र’ स्पर्धेचे देखील आयोजन करते. यात अनेक नामवंत कलाकार आणि ‘तियात्र’ संस्था आपली सादरीकरणे प्रस्तुत करीत असतात.

‘तियात्रा’तील गीते आणि ‘तियात्रां’ची सादरीकरणे आधुनिक काळात विविध प्रकारच्या साधनांद्वारे ध्वनीचित्रमुद्रित करून प्रेक्षकांच्या, अभ्यासकांच्या आणि संशोधकांच्या संदर्भासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. गोमंतकीय परंपरेचा एक घटक म्हणून ‘तियात्रा’चे संवर्धन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु त्याच वेळी समांतरपणे मुंबईतील तियात्रिस्तांचीही दखल घेण्यात यावी यासाठी देखील विशेष प्रयत्न होत आहेत.

## 6.4 मराठी संगीत नाटक आणि कोंकणी ‘तियात्र’ या दोहोंच्या सुधारणा/विकासासाठी सूचना

मराठी संगीत नाटक आणि कोंकणी ‘तियात्र’ या दोन्ही साहित्यकलाप्रकारांत गीत, संगीत, गायन हा महत्त्वाचा भाग असतो. नाट्यकृतीच्या सादरीकरणादरम्यान गायली जाणारी आणि संहितेला धरून येणारी गीते (नाटक आणि ‘तियात्र’ यांच्या संदर्भात अनुक्रमे नाट्यगीत व कांत) पूर्वनियोजित विशिष्ट चालींत बांधलेली असतात. या गीतांचे बोल जरी संहितेत छापलेले असले तरी त्यांच्या चाली मात्र कळण्यास फार अडचण होते. प्रचलित नाट्यकृती, ‘तियात्र’ असेल वा त्याविषयीची सखोल माहिती असणारी व्यक्ती परिचयात उपलब्ध असल्यास वा एखाद्या चलचित्र माध्यमावर त्या कलाकृतीचा संदर्भ उपलब्ध असल्यास त्या गीतांच्या चाली समजून घेणे शक्य होते. परंतु, तसे न झाल्यास या गीतांच्या चाली कळणे निव्वळ अशक्य ठरते.

मराठी संगीत नाटक आणि कोंकणी ‘तियात्रा’ने छापील संहितेत गीतांसोबतच त्यांच्या चालींचे नोटेशनही दिले पाहिजे. कोणताही संदर्भ नसतानाही, केवळ स्वरलिपीच्या माध्यमातून त्या गीताची चाल समजून घेणे भविष्यात कोणाही व्यक्ती, संस्था, अभ्यासक-संशोधकाला शक्य होऊ शकेल. भविष्यात नव्याने लिहिल्या जाणाऱ्या नाट्यकलाकृतींच्या संहितेत हा आवश्यक बदल करण्याबरोबरच जुन्या उपलब्ध नाट्यकृतींच्या संहिता या सुधारणेचा अंतर्भाव करून नव्याने प्रकाशित करता येऊ शकतील. अनेकदा, नाट्यकृतीतील गीतांच्या चाली माहीत होण्याचा कोणताही पर्याय

नसल्याच्या एकमेव कारणामुळे त्या नाटकाचा प्रयोग करण्याचा विचार रद्द करण्यात येतो. सुधारित पद्धतीने, नोटेशनसह नाट्यसंहिता प्रकाशित केल्यास नाट्यकलाकार, नाट्यसादरीकरणकर्त्या संस्था, रसिक, अभ्यासक, संशोधक यांची ही अडचणही दूर होऊ शकेल. नाट्यक्षेत्रात कार्य करणाऱ्या जाणकार संगीततज्ज्ञांची मदत घेऊन या सुधारणेला मूर्त रूप देणे शक्य आहे.

### 6.4.1 नियमित स्व-मूल्यांकन

नाट्यक्षेत्रातील या दोन्ही कलाप्रकारांनी आपापल्या समाजक्षेत्रातील नाट्यरंगभूमीची स्थितीगती वेळोवेळी तपासून पाहिली पाहिजे. आजच्या आधुनिक काळात मनोरंजन माध्यमे, रंगमंच या सगळ्यांत झपाट्याने बदल होत आहेत. अशा परिस्थितीत आपापल्या कलाक्षेत्रासमोर असलेली आव्हाने, संधी, मदतीचे/विकासाचे स्रोत, रसिकांची अभिरुची, रसिकांच्या सूचना, अभ्यासक-जाणकारांची मते यांचा नियमितपणे आढावा घेणे अत्यावश्यक आहे. यातूनच आपापल्या कलाक्षेत्राची पुढील वाटचाल ठरवणे आणि त्यानुसार आवश्यक बदल करणे दोन्ही साहित्यकलाप्रकारांना शक्य होईल.

### 6.4.2 सामाजिक बांधिलकी

नाट्यसादरीकरण करणाऱ्या संस्था, कलाकार, मंडळी यांचा समाजाशी अधिकाधिक, जवळचा, वेळोवेळी संपर्क होणे आवश्यक आहे. आपल्या भौगोलिक कार्यक्षेत्रातील विविध परिसरांत नैमित्तिक पद्धतीने बैठका, चर्चासत्रे, विचारमंथन, कार्यशाळा, मुक्त संवाद अशा तऱ्हेच्या कार्यक्रमांचे आयोजन करून या कलाक्षेत्रांच्या संदर्भातील विविध विषयांवर विचारांचे आदानप्रदान झाल्यास या कलाक्षेत्रांचे अधिक विकसित रूप आकाराला येईल. या कलाक्षेत्रांचा समाजाशी असणारा दुवा अधिक घट्ट होऊन त्याद्वारे रसिक पुन्हा नव्याने या कलाक्षेत्रांकडे वळण्याची परिस्थिती निर्माण करता येईल.

### 6.4.3 निधी संकलन आणि नियोजन

नाट्यक्षेत्राच्या नियमित कार्यासाठी तसेच विकासासाठी निधी हा कायम महत्त्वाचा घटक ठरतो. मदत निधी, पुरस्कृतता, तिकिट विक्री यासारख्या पारंपरिक पद्धतींसोबतच इतर पर्यायी मार्ग शोधणे तसेच जमा झालेल्या निधीचे योग्य नियोजन आणि त्याचा सुयोग्य विनियोग करण्यावर भर दिला पाहिजे. केवळ प्रत्यक्ष नाट्यप्रयोगांच्या माध्यमातून निधी मिळवणे याव्यतिरिक्त आधुनिक काळातील ऑनलाईन माध्यमांवर आपली कलाकृती प्रस्तुत करून त्याद्वारे आर्थिक पाठबळ मिळवणे यासारखे प्रयत्न करता येऊ शकतात. साठलेल्या निधीचा उत्कर्ष आणि वापर योग्य व्हावा यासाठी त्या निधीचे नियोजन आवश्यक आहे. जुन्या काळातील नाट्यमंडळींच्या आर्थिक नियोजनाचा अभ्यास केल्यास त्याचाही फायदा आजच्या काळातील नाट्यसंस्थांच्या निधी नियोजनाच्या कामी होऊ शकेल. जुन्या काळातील नाट्यसंस्थांचे आर्थिक नियोजन हा या कामी, साहित्य आणि अर्थशास्त्र या दोन्ही विद्याशाखांचा, स्वतंत्र असा आंतरविद्याशाखीय अभ्यासाचा/संशोधनाचा विषय ठरू शकतो.

### 6.4.4 सादरीकरण व्यवस्था आणि सभागृहे

बदलत्या काळात सभागृहव्यवस्था आणि मनोरंजनाची स्थळे अधिकाधिक सुसज्ज तसेच सुविधायुक्त होऊ लगाली आहेत. या पार्श्वभूमीवर विचरा करता, नाट्यकलांचे सादरीकरण ज्या ठिकाणी होते अशी स्थळेही या सर्व आधुनिक सोई-सुविधांनी युक्त असण्याची आवश्यकता आहे. प्रेक्षकांच्या आवडीनिवडीनुसार आणि गरजेनुसार सुविधांची पूर्तता केल्यास नाट्यास्वादात अधिक सुटसुटीतपणा येईल. वृद्ध व्यक्ती, वरिष्ठ नागरिक, दिव्यांगांच्या गरजा पाहता त्यानुसार सभागृहांची बांधणी होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, नाट्यसादरीकरणासाठी आवश्यक सुयोग्य असे रंगमंच, मंच व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था, प्रकाश योजना, रंगभूषा-वेशभूषा कक्ष इत्यादींची सुसज्ज व्यवस्था याही बाबींचा आधुनिक दृष्टीकोनातून विचार करावा लागेल. आपात्कालीन परिस्थितीत प्रेक्षकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी योग्य ती खबरदारी घेणेही आवश्यक ठरेल.

### 6.4.5 विषय वैविध्य

सादर होणाऱ्या कलाकृती वैविध्यपूर्ण असण्यावर अधिक भर दिला गेला पाहिजे. वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करणाऱ्या, वेगवेगळ्या वयोगटातील प्रेक्षकांना नजरेसमोर ठेवून तयार केलेल्या, वेगवेगळ्या प्रकारच्या सादरीकरण तंत्रांचा वापर करणाऱ्या कलाकृती सादर झाल्यास या दोन्ही कलाक्षेत्रांत वैविध्य निर्माण होऊन त्याद्वारे रसिकांची उत्सुकता वाढीस लागण्यात मदत होईल.

### 6.4.6 संघ निवड

नाट्यसादरीकरणाच्या उत्कृष्ट सादरीकरणासाठी सुयोग्य असे कलाकार मिळवण्यासाठी चित्रसृष्टीच्या धर्तीवर चाचणी (ऑडीशन) घेऊन अभिनेते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ यांची जमवाजमव केल्यास उत्तम नाट्यसंघ तयार करता येणे शक्य आहे. या संघात प्रामुख्याने अधिकाधिक स्थानिक कलाकारांसोबत अन्य प्रदेशांतील व्यावसायिक कलाकारांचाही समावेश करण्याचा विचार व्हावा. याद्वारे कलाकारांदरम्यान अनुभव आणि कल्पनांचे आदानप्रदान होऊन नाट्यसादरीकरण प्रभावी होईल. हे करताना नाट्यसादरीकरणाचे औचित्य आणि स्वरूपही लक्षात घ्यावे लागेल. हौशी रंगभूमीवर करावयाचे नाट्यासदरीकरण असल्यास पूर्णपणे स्थानिक कलाकार चालू शकतील परंतु व्यावसायिक प्रयोग वा स्पर्धा यांच्यासाठी करावयाच्या सादरीकरणासाठी कलाकार निवडताना त्याच पद्धतीने विचार होणे गरजेचे ठरेल.

### 6.4.7 व्यावसायिक दृष्टीकोन आणि प्रसिद्धी

आधुनिक काळात वैविध्यपूर्ण पद्धतीने आपल्या कलाकृतीची जाहिरात करणे आणि ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोचेल हे सुनिश्चित करणे अतिशय महत्त्वाचे ठरते. कलाकृती जरी दर्जेदार असली तरी अधिकाधिक लोकांपर्यंत ती जोपर्यंत पोचत नाही तोपर्यंत तिच्या दर्जेदारपणाला काहीही अर्थ राहत नाही हे सरळ अर्थकारण तंत्र आहे. उपलब्ध विविध प्रसिद्धीमाध्यमांचा, समाजमाध्यमांचा, वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी वाहिन्या, प्रसिद्धी कार्यक्रम (प्रोमोशन शोज) या सोयींचा वापर करून आपली नाट्यकलाकृती अधिकाधिक लोकांच्या चर्चेचा विषय होणे यासाठीही उपाययोजना करण्याची आवश्यकता भासताना दिसते. एखाद्या नाट्यकलाकृतीने अपेक्षित यश प्राप्त केल्यानंतर ते यश साजरे

करणारा कार्यक्रम आयोजित केल्यास त्याद्वारे कलाकृतीची चर्चा पुन:पुन्हा होत राहील हे निश्चित करता येते. एखाद्या नाट्यकलाकृतीच्या संदर्भात चर्चात्मक कार्यक्रम, कलाकारांच्या मुलाखती यासारखे उपक्रम हाती घेतल्यास लोकांपर्यंत त्या कलाकृतीचे अनेक पैलू पोचवणे शक्य होईल. समाजातील वेगवेगळ्या उपेक्षित आणि दुर्लक्षित घटकांपर्यंत नाट्यकलाकृती आणि सादरीकरण पोचावे या हेतूने त्यांच्यासाठी खास प्रयोग करणे, सवलतीच्या दरात तिकीट उपलब्ध करून देणे याही मुद्द्यांचा अवलंब करता येईल.

### 6.4.8 परस्परसहयोग

स्थानिक सांस्कृतिक संस्था, शाळा, महाविद्यालये, कला संघटना यांसारख्या घटकांसोबत परस्पर सहकार्य आणि सहयोग वाढीस लागावा याकडेही नाट्यक्षेत्राने लक्ष देणे आवश्यक आहे. या संस्थांशी सहकार्य वाढवून त्यांच्यासोबत काही उपक्रम केल्यास त्यांतून नवे कलाकार, तंत्रज्ञ मिळण्याची शक्यता वाढीस लागेल. त्याचप्रमाणे नाट्यविषयक जाणीव या माध्यमातून नव्या पीढीपर्यंत पोचल्यास नाट्याविषयीची गोदी निर्माण होऊन नव्या पीढीतील रसिक नाट्यक्षेत्राला मिळतील.

### 6.4.9 दर्जा आणि गुणवत्ता

अन्य सर्व घटकांची खबरदारी आणि निश्चिती करत असताना नाट्यक्षेत्राने ज्या मुद्द्याकडे सर्वात जास्त लक्ष दिले पाहिजे ते म्हणजे कलाकृतीची गुणवत्ता आणि दर्जा हे होय. सर्व प्रकारच्या सोयीसुविधा जरी असल्या तरी मूळ कलाकृती वा सादरीकरणच दर्जेदार, गुणवत्तापूर्ण नसेल तर रसिक त्याकडे पाठच फिरवतील. त्यामुळे नव्या लेखकांनी, दिग्दर्शकांनी, कलाकारांनी, तंत्रज्ञांनी आपल्या कलाकृतीच्या, सादरीकरणाच्या गुणवत्तेकडे सर्वात अधिक लक्ष देणे ही या नाट्यक्षेत्रातील सर्वोच्च प्राथमिकता ठरते.

### 6.4.10 प्रतिक्रिया आणि सादरीकरणोत्तर प्रेक्षक-संवाद

नाट्यप्रयोगासाठी आलेल्या प्रेक्षकांशी सादरीकरणानंतर संवाद साधणे आणि त्याद्वारे त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे महत्त्वाचे आहे. प्रेक्षकांच्या सूचना, निरीक्षणे आणि टीका यांचा विचार करून त्याद्वारे आवश्यक बदल कलाकृतीत व सादरीकरणात केल्यास नाट्यकलाकृतीचा अधिकाधिक उत्कर्ष साधता येईल. सादरकर्त्यांच्या नजरेतून निसटलेले मुद्दे वाचकांच्या वा प्रेक्षकांच्या सूचनेतून प्राप्त झाल्यास आणि पर्यायाने त्याचा अंतर्भाव पुढील प्रयोगात केल्यास त्याने निश्चितच कलाकृतीची/सादरीकरणाची उंची, दर्जा वाढीस लागेल.

### 6.4.11 मुक्त धोरण

नाट्यक्षेत्राच्या एकूणच दीर्घकालीन वाटचालीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी खुले आणि सर्वसमावेशी धोरण सर्वच घटकांनी स्वीकरणे आवश्यक आहे. नाट्यक्षेत्रातील सद्यस्थितीच्या अडचणी, आव्हाने, त्यावरील संभाव्य उपाययोजना, नाट्यक्षेत्राच्या वृद्धीसाठी संभाव्यत: घ्यावे लागू शकणारे कठोर निर्णय या सर्वांसाठी सर्व घटकांनी तयार राहिले पाहिजे. व्यक्तीगत हेतूपेक्षाही नाटकाची अभुवृद्धी या गोष्टीला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले पाहिजे. बदलत्या काळानुसार येऊ घातलेल्या बदलांसाठी नाट्यक्षेत्राने तयार राहिल्यास नव्या बदलांचा स्वीकार करून नाट्यक्षेत्राचा विस्तार शक्य करता येईल.

## 6.5 समारोप

नाट्यक्षेत्राने विविध कालखंडात वेगवेगळ्या प्रकारच्या स्थित्यंतरांचा सामना केलेला आहे. काळाच्या आवश्यकतेनुसार तसेच परिस्थितीनुसार नाट्यक्षेत्राने स्वत:त आवश्यक बदल केले. आशय-विषय, भाषा, सादरीकरण, तांत्रिकता यासारख्या अनेक गोष्टींत महत्त्वाचे टप्पे पार करत नाट्यक्षेत्राने आजवर वाटचाल केली आहे. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' या दोन्ही साहित्यकलाप्रकारांसमोर आज स्वतंत्र आव्हाने आणि संधी उपलब्ध आहेत. दोन्हींसमोर असलेल्या सकारात्मक आणि नकारात्मक सर्व बाबींचा गंभीरपणे विचार करून या दोन्ही साहित्यकलाक्षेत्रांचा भावी काळातील प्रवास अधिक समृद्धशाली होण्यासाठी सर्व संबंधित घटकांचे संपूर्ण योगदान

अपेक्षित आहे. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी ‘तियात्र’ या दोहोंचे गतवैभव आगामी काळात निश्चित प्राप्त होईल हा आशावाद मनात बाळगून प्रत्येक घटकाने आपले संपूर्ण योगदान देणे ही काळाची गरज आहे.

*****